# ६. रंग माझा वेगळा

■ **सुरेश भट** (१९३२ ते २००३) :

सुप्रसिद्‌ध कवी, पत्रकार, संपादक. काही काळ वृत्तपत्रात वार्ताहर व साप्ताहिक 'बहुमत'चे संपादक. 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात' या संग्रहांनी त्यांच्या कवितांचे वेगळेपण आणि गझलकार म्हणून स्थान निश्चित केले. त्यांचे खरे सामर्थ्य त्यांच्या राजकीय-सामाजिक आशयाच्या कवितांतून जाणवते. माणसांचा दुटप्पी व्यवहार, स्वार्थ, ढोंगीपणा, लाचारी, समाजातील मूल्यहीनता, 'मी' ची समाजाने केलेली मानहानी यांविषयीचा प्रखर संताप ते व्यक्त करतात. प्रेमकवितेतील त्यांची मृदू व हळुवार शब्दकळाही कधीकधी तीक्ष्ण, धारदार व उपरोधिक बनते. 'गझल' या रचनाबंधाचा निष्ठापूर्वक स्वीकार व दृढनिश्चयी प्रसार हे सुरेश भट यांचे काव्यपरंपरेतील खरे योगदान. 'गझल' हा रचनाबंध लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

'रंग माझा वेगळा' या अत्यंत गाजलेल्या गझलेत आपणाला गझलकाराच्या अगदी वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होते. सगळ्या गुंत्यात गुंतूनही आपला पाय मोकळा ठेवणाऱ्या कलंदर व्यक्तिमत्त्वाला येणारे अनुभवही जगावेगळेच असतात. एरव्ही सर्वांना उन्हाच्या झळा लागतात; परंतु अशा जगावेगळ्या माणसाला सावलीच्याही झळा लागतात. दु:खाचा अनुभव तर नेहमीचाच असतो; परंतु कधी काळी मिळणारे सुखही अशाप्रकारे मिळते, की त्याने आनंद वाटण्याऐवजी दु:खच वाटते. त्यामुळे गझलकाराला वाटत राहते, की जगण्यास सुरुवात करतानाच आयुष्याने आपला विश्वासघात केला आहे; परंतु अशाही परिस्थितीत दु:खांचा हसतमुखाने स्वीकार करत गेल्यामुळे दु:खांनाही माझा लळा लागला असा गझलकाराचा अनुभव आहे. त्याने स्वत:ला 'माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य' म्हटले आहे. ज्यांचे आयुष्य नैराश्य, अंधकाराने व्यापलेले आहे, त्यांच्यासाठी पेटून उठणारा मी सूर्य आहे असे तो जेव्हा नमूद करतो तेव्हा त्याची प्रखर सामाजिक बांधिलकी दिसून येते. 'सावल्यांच्या झळा', 'दु:खाचा लळा', 'मध्यरात्री हिंडणारा सूर्य' यांसारख्या परस्परविरोधी भावच्छटांमुळे अर्थाच्या दृष्टीने गझल वेगळ्या उंचीवर पोहोचते. अगदी योग्य ठिकाणी येणारे यमक, अनुप्रास यामुळे गझलेला अप्रतिम गेयता लाभली आहे.

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!

राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दु:ख ज्याला लागला माझा लळा!

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!

सांगती 'तात्पर्य' माझें सारख्या खोट्या दिशा :
''चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा!''

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

**(रंग माझा वेगळा)**

## कृती

### (१) (अ) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधा.

| अर्थ | ओळ |
|---|---|
| (१) सर्वांमध्ये मिसळूनही मी माझे वेगळेपण जपतो. | ................................ |
| (२) मदत करायला येणारे अशाप्रकारे मदत करतात, की त्याचाही मला त्रास होतो. | ................................ |
| (३) हे कोणते अनामिक दु:ख आहे, की ज्याला सदैव माझ्याविषयी प्रेम वाटावे ? | ................................ |
| (४) आयुष्याने माझीच का बरे फसगत केली ? | ................................ |

### (आ) कृती करा.

**कवितेतील विरोधी भाव दर्शवणाऱ्या गोष्टी**
→
→
→
→

### (इ) योग्य जोड्या लावा.

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (१) माणसांची मध्यरात्र | (अ) नैराश्यातील आशेचा किरण |
| (२) मध्यरात्री हिंडणारा सूर्य | (आ) इतरांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याची वृत्ती |
| (३) माझा पेटण्याचा सोहळा | (इ) माणसांच्या आयुष्यातील नैराश्य |

### (ई) एका शब्दांत उत्तरे लिहा.

(१) कवीची सदैव सोबत करणारी ..........................
(२) कवीचा विश्वासघात करणारे ..........................
(३) खोट्या दिशा सांगतात ते ..........................
(४) माणसांच्या अंधकारमय जीवनात साथ देणारा ..........................

### (२) खालील शब्दांचे अर्थ लिहा.

(१) तात्पर्य– (३) गुंता–
(२) लळा– (४) सोहळा–

### (३) खालील ओळींचा अर्थ लिहा.

(अ) रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!

(आ) कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!

### (४) काव्यसौंदर्य.

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

या ओळींमधील भावसौंदर्य स्पष्ट करा.

### (५) रसग्रहण.

**खालील ओळींचे रसग्रहण करा.**

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!

राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दु:ख ज्याला लागला माझा लळा!

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!

### (६) अभिव्यक्ती.

(अ) 'समाजात स्वत:चे वेगळेपण जपण्यासाठी प्रयत्न करावेच लागतात', सोदाहरण स्पष्ट करा.
(आ) कवीच्या आयुष्याने केलेली त्याची फसवणूक तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.
(इ) 'मी मध्यरात्री हिंडणारा सूर्य आहे', असे कवी स्वत:बाबत का म्हणतो ते लिहा.

**उपक्रम :**

(अ) मराठी गझलकारांच्या गझला मिळवून वाचा.
(आ) यू-ट्यूबरील विविध मराठी गझल ऐकून आनंद मिळवा.

- **तोंडी परीक्षा.**

'रंग माझा वेगळा' ही गझल सादर करा.